
भारतीय शिक्षण

दीपावली

विशेषांक

# (कुशल शिक्षण)



## महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ

## -अनुक्रमणिका-


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| ✦एका यशस्वी उद्योजकाच्या भूमिकेतून 'श्री.चंद्रकांत झुरंगे' | डॉ.मनोज बोराटे | ६४ |
| ✦सद्य:स्थिती : कुशल शिक्षण - गरज आणि आवश्यकता | डॉ.नंदा हरम | ६७ |
| ✦कौशल्य शिक्षण - काळाची गरज | श्री.अभिजीत गिरी | ७० |
| ✦ताणतणाव व्यवस्थापन : एक कौशल्य | डॉ.विद्युलता पांढरे<br>प्रा.सविता दुधभाते | ७३ |
| ✦कुशल शिक्षण व स्थलांतर : एक सर्वेक्षण | श्रीमती माधुरी कुलकर्णी | ७७ |
| ✦कौशल्यपूर्ण कोर्स - चौथी शाखा व्होकेशनलची | श्रीमती मृणाल इंदप | ८२ |
| ✦य.च.म.मु. विद्यापीठाचे (नाशिक) कुशल मनुष्यबळ निर्मितीत योगदान | डॉ.सज्जन थूल | ८५ |
| ✦कौशल्य सारे रचनेत आहे (कौशल्य अध्ययन आणि रचनावाद) | डॉ.दत्तात्रेय तापकीर | ९१ |
| ✦बालभारती (इ.७ वी) : कुशल शिक्षण : एक अभ्यास | डॉ.बी.जी.खाडे | ९५ |
| ✦मुख्य जीविकेतले कौशल्य कळीचे | श्री.मिलिंद धत्ते | १०६ |
| ✦आदर्श पाठ्यक्रमात कुशल शिक्षणाचे स्थान | श्रीमती अनुजा चव्हाण | १०९ |
| ✦शैक्षणिक प्रस्ताव | अनुवाद-बाळकृष्ण भागवत | ११२ |
| ✦कौशल्यविकास व उद्योजकतेत महाराष्ट्राची भूमिका | डॉ.नरेंद्र जोशी | ११४ |
| ✦श्रद्धांजली :- १) श्री.श्रीपाद पडळकर २) कवयित्री शिरीष पै ३) लेखक अरुण साधू ४) साहित्यिक हनुमंत मराठे | श्री.शशिकांत पडळकर | ११६ |

# य.च.म.मु. विद्यापीठाचे (नाशिक) कुशल मनुष्यबळ निर्मितीत योगदान

- डॉ.सज्जन थूल, नाशिक, संपर्क - ९४०३७७४५३२

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची
वात सन १९८९ पासून झालेली आहे.
नगंगा घरोघरी' या बोधवाक्यानुसार विद्यापीठाने
टप्प्याने व्यवसायिक शिक्षणक्रम सुरु केलेले
त. या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना
यनात लवचीकता, काम करता करता शिक्षण,
णापासून वंचित राहिलेल्यासाठी शिक्षण व
ायिक कौशल्य आत्मसात करण्याच्या संधीची
ब्धता; या आधारभूत विद्यापीठाच्या उद्दिष्टांनुसार
णक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. सध्या
पीठात एकूण आठ विद्याशाखा व एक शैक्षणिक
ग यांच्याद्वारे शिक्षणक्रम राबवले जातात.
राष्ट्रात आठ विभागीय केंद्रे आहेत. या विभागीय
र्गत येणाऱ्या अभ्यासकेंद्रावर विविध शिक्षणक्रमांची
लबजावणी केली जात आहे. विद्यापीठाने काही
णक्रम हे उद्योग व्यवसायिकांशी करार करून
विले जात आहेत. विविध शिक्षणक्रमाची
लबजावणी अभ्यासकेंद्रावर केली जाते. या
ासकेंद्रावर प्रशिक्षित संमंत्रक कार्य करीत
त.

सध्या भारतातील 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट
रेशन' व 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट एजेंसीद्वारा
ल मनुष्यबळ विकसनाचे कार्य केले जात आहे.
र्ट अप इंडिया, स्किल कॅपिटल, एनएसक्युएफ,
मार्केट इनफार्मेशन सिस्टिम इत्यादी महत्त्वाच्या
शब्दांचा वापर करून कुशल मनुष्यबळाचा
ास केला जात आहे. य.च.म.मुक्त विद्यापीठाचे
गुरू, प्रा. ई. वायुनंदन ह्यांनी कुशल मनुष्यबळाच्या
र्मितीसाठी अद्ययावत ज्ञान व कौशल्यमुक्त
व्यवसायिक शिक्षणक्रम गुणवत्तापूर्ण राबवण्याकडे विशेष लक्ष दिलेले आहे. अशा शिक्षणक्रमाला ग्रामीण भागापासून विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. सध्या विद्यापीठाने प्रमाणपत्र शिक्षणक्रमापासून ते पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमापर्यंतचे विविध व्यावसायिक व अव्यावसायिक १०६ शिक्षणक्रम उपलब्ध करून दिलेले आहेत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सुरू केलेल्या विविध शिक्षणक्रमांच्या अध्ययनाद्वारे महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केलेले आहे. या शिक्षणक्रमांमध्ये तात्त्विक भागासह प्रात्यक्षिक भागावर जास्त भर दिलेला आहे. बी.ए.(आर्मी) हा शिक्षणक्रम लष्करातील सैनिकांना शैक्षणिक पात्रतेबरोबरच अद्ययावत ज्ञान वाढविण्यास उपयुक्त ठरणार आहे. महाराष्ट्रातील १०वी पास किंवा नापासांसाठी विविध शिक्षणक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. अशा शिक्षणक्रमांमधून ज्ञान व कौशल्ये प्राप्त करून विद्यार्थ्यांनी स्वत:चे उद्योग सुरू केलेले आहेत किंवा उद्योगक्षेत्रात सेवा करीत आहेत. कित्येक विद्यार्थ्यांनी सेवाकौशल्यात गुणवत्ता वाढवून उद्योग सुरू केलेले आहेत कुशल मनुष्यबळ निर्मितीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रमाची उपयुक्तता सिद्ध होत आहे.

**१.बी.एस्सी(इंडस्ट्रीअल ड्रग सायन्स) शिक्षणक्रम:-**

विद्यापीठाने ल्युपीन या कंपनीशी करार करुन हा शिक्षणक्रम राबवण्यात येत आहे. कमवा व शिका या योजनेंतर्गत विद्यार्थी या शिक्षणक्रमाला

प्रवेश घेऊ शकतो. या शिक्षणक्रमासाठी १२वी विज्ञान पास ही प्रवेशाची अट ठेवलेली आहे. सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना हा शिक्षणक्रम उपयुक्त आहे. हा शिक्षणक्रम तीन वर्ष कालावधीचा असून, या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र हे कंपनीमध्येच आहे. या शिक्षणक्रमासाठी ६० विद्यार्थी प्रवेश घेतात. यात प्रवेश घेण्यासाठी कंपनी विद्यार्थ्यांची मुलाखत घेते. त्यानंतर प्रवेश नोंदणीसाठी विद्यापीठाला विद्यार्थ्यांची यादी पाठविण्यात येते. ह्या विद्यार्थ्याला त्यांच्या व्यवसायातील ज्ञान व कौशल्य अद्ययावत करता येते. या शिक्षणक्रमातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी अनुक्रम ७, ८ व ९ हजार प्रतिमाह स्टायपेंड दिला जातो. कंपनीकडून विद्यार्थ्यांचे शिक्षणक्रम शुल्क भरले जाते. कंपनीसाठी आवश्यक ड्रग संदर्भातील सर्व ज्ञान व कौशल्य या शिक्षणक्रमामधून विकसित करण्यात येते. कंपनीमध्येच नोकरी करता-करता शिक्षणक्रमातील प्रात्यक्षिके व थेअरी कोर्स पूर्ण करता येतो. विद्यार्थ्याने केलेल्या अध्ययनाचे मूल्यमापन करून प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. त्यानंतर कंपनी पूर्णवेळ कर्मचारी म्हणून नियुक्ती करते. या शिक्षणक्रमाची गरज व व्यवसायातील कौशल्य अद्ययावत करणे तसेच कुशल कर्मचारी उपलब्ध होण्यासाठी या कमवा व शिका योजनेचे महत्त्व आहे.

### २. बॅचलर ऑफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन पदवी (बीबीए) शिक्षणक्रम :-

हा शिक्षणक्रम एमकेसीएलशी करार करुन राबवण्यात येतो. कमवा व शिका या योजनेंतर्गत विद्यार्थी शिक्षणक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. या शिक्षणक्रमासाठी १२वी कला/वाणिज्य/विज्ञान पास ही प्रवेशाची अट ठेवलेली आहे. सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. हा शिक्षणक्रम तीन वर्ष कालावधीचा आहे. या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र हे य.च.म.मुक्त विद्यापीठ मुख्यालय व विभागीय केंद्र आहे. या शिक्षणक्रमासाठी ३४ विद्यार्थी प्रवेश घेतात. या शिक्षणक्रमाला प्रवेश घेण्यासाठी एमकेसीएलच्या वेबवर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा लागतो. त्यांनतर एमकेसीएल व यचममुक्त विद्यापीठाच्या संयुक्तपणे विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात येते. त्यांनंतर प्रवेश नोंदणीसाठी विद्यापीठाला विद्यार्थ्यांची यादी पाठविण्यात येते. एमकेसीएलच्या वेबवरुन विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्ययन करावे लागते. विद्यापीठातील समंत्रक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अशैक्षणिक समस्या सोडवितात. ह्या विद्यार्थ्याला संगणक सॉफ्टवेअर व्यवसायातील ज्ञान व कौशल्य अद्ययावत करता येते. या शिक्षणक्रमातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी अनुक्रमे ७,८ व ९ हजार प्रतिमाह स्टायपेंड दिला जातो. विविध कंपन्यांसाठी संगणक सॉफ्टवेअर संदर्भातील सर्व ज्ञान व सॉफ्टवेअर कंपनीत ॲडमिनिस्ट्रेटर याशिवाय अनेक क्षेत्रात नोकरी करता येते. या शिक्षणक्रमातील प्रात्यक्षिके व सैद्धांतिक कोर्स पूर्ण केल्यानंतर व विद्यापीठ या शिक्षणक्रमातील विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून प्रमाणपत्र प्रदान करते.

### ३. फार्मा मॅन्युफॅक्चरिंग पदविका शिक्षणक्रम:-

हा शिक्षणक्रम होखार्ट या कंपनीशी करार करून राबवण्यात येतो. या शिक्षणक्रमाला १०वी पास व कंपनीचा कर्मचारी ही प्रवेशाची अट ठेवलेली आहे. हा शिक्षणक्रम एक वर्ष कालावधीचा आहे. या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र या कंपनीमध्येच आहे. या शिक्षणक्रमासाठी ६० विद्यार्थी प्रवेश घेतात. ह्या विद्यार्थ्याला त्याच्या व्यवसायातील ज्ञान व कौशल्य अद्ययावत करण्याची संधी या शिक्षणक्रमामुळे मिळाली आहे. विद्यार्थ्याला प्रात्यक्षिके व थिअरी कोर्स पूर्ण करावा लागतो. विद्यापीठ या शिक्षणक्रमातील विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून प्रमाणपत्र प्रदान करते.

### ४. इंडस्ट्रीअल सायन्स (फार्मास्युटिकल) पदविका शिक्षणक्रम :-

हा शिक्षणक्रम सिपला या कंपनीशी करार

ार्थी प्रवेश घेतात. या
साठी एमकेसीएलच्या
करावा लागतो. त्यांनतर
द्यापीठाच्या संयुक्तपणे
त येते. त्यांनतर प्रवेश
ा विद्यार्थ्यांची यादी
च्या वेबवरुन विद्यार्थ्यांना
लागते. विद्यापीठातील
क्षणिक व अशैक्षणिक
र्थ्याला संगणक सॉफ्टवेअर
शल्य अद्ययावत करता
प्रथम, द्वितीय व तृतीय
व ९ हजार प्रतिमाह
ध कंपन्यांसाठी संगणक
र्व ज्ञान व सॉफ्टवेअर
शिवाय अनेक क्षेत्रात नोकरी
क प्रात्यक्षिके व सैद्धांतिक
ापीठ या शिक्षणक्रमातील
न प्रमाणपत्र प्रदान करते.

**पदविका शिक्षणक्रम:-**

ार्ट या कंपनीशी करार
शिक्षणक्रमाला १०वी पास
शाची अट ठेवलेली आहे.
धीचा आहे. या शिक्षणक्रमाचे
आहे. या शिक्षणक्रमासाठी
ह्या विद्यार्थ्याला त्याच्या
ल्य अद्ययावत करण्याची
ाळी आहे. विद्यार्थ्याला
र्ण करावा लागतो. विद्यापीठ
र्थ्यांचे मूल्यमापन करून

**स (फार्मास्युटिकल)**

पला या कंपनीशी करार



करून राबवण्यात येतो. या शिक्षणक्रमाला १० पास व कंपनीचा कर्मचारी ही प्रवेशाची अट ठेवलेली आहे. हा शिक्षणक्रम एक वर्ष कालावधीचा आहे. या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र या कंपनीमध्येच आहे. या शिक्षणक्रमासाठी ६० विद्यार्थी प्रवेश घेतात. ह्या विद्यार्थ्याला त्याच्या व्यवसायातील ज्ञान व कौशल्य अद्ययावत करण्याची संधी या शिक्षणक्रमामुळे मिळाली आहे. या शिक्षणक्रमातील प्रात्यक्षिके व थिअरी कोर्स पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

### ५. ब्युटी पार्लर पदविका शिक्षणक्रम :-

या शिक्षणक्रमाला १० वी पास विद्यार्थी प्रवेशाची अट ठेवलेली आहे. विद्यापीठाने या शिक्षणक्रमाच्या अध्ययन पुस्तकांची निर्मिती केलेली आहे. या शिक्षणक्रमाच्या आशयाचे स्वयंअध्ययन होण्यासाठी चित्रे, तक्ते, आकृत्या, उदाहरणे व प्रक्रिया आशय देण्यात आलेला आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण करुन विद्यार्थी ब्युटी पार्लर शॉप, मसाज सेंटर, घरगुती व्यवसाय व संबंधित साहित्याची दुकाने सुरू करू शकतात. विद्यार्थ्यांनी ब्युटी पार्लर व्यवसायातून अधिक गुणवत्तापूर्ण तसेच आधुनिक कौशल्य विकसित करून स्वयं रोजगार सुरू केलेला आहे.

### ६. टेलरिंग प्रमाणपत्र शिक्षणक्रम :-

या शिक्षणक्रमाला प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याला वाचता व लिहिता येणे एवढीच पात्रता ठेवलेली आहे. या शिक्षणक्रमामधून विद्यार्थ्याला शिवणकाम करण्याची कला व कौशल्य आत्मसात करता येते. याबरोबरच स्वयंरोजगार म्हणून शिवणकामाचा व्यवसाय सुरू करता येतो. पुरुष व महिला या दोन्ही वर्गासाठी शिक्षणक्रम उपलब्ध करून दिलेला आहे.

### ७. भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम :-

या शिक्षणक्रमाला १०वी पास विद्यार्थी प्रवेश घेतात. या शिक्षणक्रमांतर्गत जर्मन, फ्रेंच, इंग्रजी, अरेबिक या भाषा विकासासंबंधी ज्ञान व कौशल्ये विकसित केली जातात. विदेशी भाषा समजल्यानंतर विद्यार्थी संबंधित देशात नोकरी करू शकतो. भाषेचे संप्रेषण करू शकतो. भारतातील इतर भाषेचे वरील संबंधित भाषेत भाषांतर करून स्वयंव्यवसाय सुरु करु शकतो. वैयक्तिक विकासाच्या दृष्टीने या भाषेवर प्रभुत्व मिळविल्यामुळे अध्यापन व अध्ययनातील आंतरक्रियेत गुणवत्ता वाढविता येते. संबंधित भाषेतील पुस्तकाचे व साहित्याचे वाचन करता येते.

### ८. पाणी व्यवस्थापन प्रमाणपत्र :-

या शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्याला वाचता व लिहिता येणे आवश्यक आहे. या शिक्षणक्रमातून विद्यार्थ्याला पाणी वापरण्याची पद्धत, पाणी साठविण्याची पद्धत व पाण्याची उपयुक्तता याविषयीचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य विकसित करता येते. हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी सामाजिक विकास, वैयक्तिक विकास व राष्ट्र विकासात हातभार लावू शकतात. शेतीच्या व्यवसायात पाणी व्यवस्थापनावर भर देण्यात येत आहे.

### ९. इलेक्ट्रिक व डोमेस्टिक अप्लायसेंस पदविका शिक्षणक्रम :-

या शिक्षणक्रमाला प्रवेशासाठी १०वी पास शैक्षणिक पात्रता प्रवेशासाठी ठेवलेली आहे. हा शिक्षणक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर इलेक्ट्रिक व वायरिंग संदर्भात ज्ञान व कौशल्य विकसित होतात. विद्यार्थ्याला स्वत:चा व्यवसाय सुरु करता येतो. या शिक्षणक्रमातून विद्यार्थ्याला घरगुती वापरातील उपकरणे व घरातील इलेक्ट्रीक वायरिंग दुरुस्ती करता येते. कंपनी किंवा इतर उद्योगात नोकरी करता येते. स्वयंरोजगार म्हणून वाहन दुरुस्तीचे दुकान सुरू करता येते. दोन चाकी किंवा चारचाकी

वाहन निर्मिती कारखान्यात नोकरी करता येते.

**१०. फॅब्रिकेशन पदविका शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमासाठी १०वी पास उत्तीर्णतेची अट ठेवलेली आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांत वेल्डिंग व फॅब्रिकेशन संदर्भात ज्ञान व कौशल्य विकसित होतात. विद्यार्थ्याला स्वत:चा फॅब्रिकेशन व्यवसाय सुरू करता येतो. उद्योगक्षेत्रात वेल्डर म्हणून नोकरी करता येते. मोटर वाहन तसेच बऱ्याच उद्योगात वेल्डरचे काम करता येते.

**११. सलून टेक्निक पदविका शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमासाठी लिहिता वाचता येणाऱ्याला प्रवेश दिला जातो. या शिक्षणक्रमामधून विद्यार्थ्यांचे तात्त्विक ज्ञानासह केशकर्तनाचे कौशल्य विकसित होते. विद्यार्थ्याला स्वत:चा सलून व्यवसाय सुरू करता येतो. शासकीय, निमशासकीय व खाजगी उद्योगात नोकरी करता येते. या व्यावसायिक शिक्षणक्रमातून सलून व्यवसायातील आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करण्याचे कौशल्य प्राप्त होते. पारंपरिक सलून व्यवसायात आधुनिक सलून व्यवसायाचा विकास करण्याचे कौशल्य प्राप्त होते. वैयक्तिक गरजेमुळे या शिक्षणक्रमाला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**१२. फायर व सेफ्टी इंजिनिअर आणि व्यवस्थापन शिक्षणक्रम :-**

हा शिक्षणक्रम प्रमाणपत्र, पदविका व पदवी स्तरावर सुरू करण्यात आलेला आहे. या शिक्षणक्रमासाठी १०वी पास उत्तीर्ण विद्यार्थ्याला अट पूर्ण करावी लागते. पुढे व्हर्टिकल मोबालिटी पद्धतीनुसार पदविका, पदवी शिक्षणक्रम पूर्ण करता येतो. या शिक्षणक्रमातून विद्यार्थ्याला अग्निशामन दलात भरती होता येते. वैयक्तिक जीवनावश्यक सुरक्षासंदर्भात ज्ञान व कौशल्य प्राप्त करता येते.

**१३.इंटिरिअल डिझाईन डेकोरेटर शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमाला १०वी पास विद्यार्थी प्रवेश शकतो. या शिक्षणक्रमाद्वारे विद्यार्थ्यात इंटिअर डिझाईन डेकोरेटरचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करता येतात. घरबांधकाम व्यवसायात स्वत:चा व्यवसाय करता येतो. कापड उद्योग व्यवसायात नोकरी करता येते. कापडावरील इंटिरिअर डिझाईनमधील कौशल्याची गुणवत्ता वाढवून स्वयंरोजगार करता येतो. काळानुरूप बदललेल्या पोशाखातील डिझाईनला व्यवसायात फार मोठी मागणी आहे.

**१४. फिटर पदविका शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमाला १० वी पास शैक्षणिक पात्रता अनिवार्य आहे. या शिक्षणक्रमामधून फिटरविषयी ज्ञान व कौशल्य विकसित करता येतात. फिटरच्या ज्ञानामुळे उद्योग व्यवसायात फिटर म्हणून नोकरी करता येते. स्वत:चा व्यवसाय करता येतो. फिटरच्या कौशल्यामुळे दुरुस्तीचे दुकान सुरु करता येते.

**१५. कम्प्युटर हार्डवेअर मेंन्टनंस व नेटवर्क टेक्नॉलॉजी पदविका शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमासाठी १०वी पास उत्तीर्णता अट ठेवण्यात आलेली आहे. या शिक्षणक्रमाचा कालावधी एक वर्षाचा आहे. या शिक्षणक्रमामधून संगणकाच्या बेसिक ज्ञान व कौशल्य विकसित केली जातात. याशिक्षणक्रमामुळे विद्यार्थ्याला संगणक दुरुस्ती, सायबर कॅफे, संगणक दुरुस्ती व विक्रीची दुकाने सुरू करता येतात. संगणकाचे प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू करण्याची अट पूर्ण करता येते. स्वयं रोजगारातून चांगल्या प्रकारे मिळकत करता येते. संगणकाच्या सुट्या भागांचे दुकान सुरू करता येते.

**१६. बी.लिब.व एम.लिब. शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमासाठी किमान पदवी कोणत्याही

विषयात असलेल्या व्यक्तीस बी.लिब. शिक्षणक्रमाला प्रवेश दिला जातो. दोन्ही शिक्षणक्रम एक वर्षाच्या कालावधीचे आहे. या शिक्षणक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर अध्ययनार्थीमध्ये ग्रंथालयातील व्यवस्थापनाची माहिती व कौशल्य विकसित होतात. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे, संशोधन संस्था व इतर शैक्षणिक विभागात ग्रंथपाल म्हणून नोकरी करता येते. सार्वजनिक ग्रंथालय सुरू करता येते. माहिती स्त्रोत सेवक म्हणून कार्य करता येते.

**१७. कृषी प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रम:-**

या शिक्षणक्रमांत माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र, फळबागा, उत्पादन, फुलशेती उत्पादन, भाजीपाला उत्पादन, कृषि व्यवस्थापन, उद्यानविद्या पदविका शिक्षणक्रम राबविले जातात. या शिक्षणक्रमासाठी १०वी उत्तीर्णता ही अट ठेवली आहे. या शिक्षणक्रमाद्वारे शेतीविषयक ज्ञान व कौशल्ये विकसित केली जातात. हे शिक्षणक्रम उत्तीर्ण केल्यानंतर ग्रामसेवक, बागेसाठी माळी सेवक व कृषि विभागात सेवा करता येते. याबरोबरच स्वत:चा उद्योग सुरू करता येतो. कृषि नर्सरी, फुल नर्सरी, वनऔषध नर्सरी खासगीरीत्या सुरु करता येते. या शिक्षणक्रमाद्वारे प्राप्त ज्ञान व कौशल्याच्या आधारे स्वत:च्या शेतातील पीक उत्पादन वाढविता येते. आधुनिक शेती विकसित करता येते.

**१८. बी.ए.जनसंज्ञापन पदवी :-**

या अभ्यासक्रमासाठी १२वी उत्तीर्णतेची अट आहे किंवा मुक्त विद्यापीठाची पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण करावा लागतो. या शिक्षणक्रमाचा कालावधी तीन वर्षाचा आहे. या शिक्षणक्रमातून पत्रकारिताचे ज्ञान व लेखनाचे कौशल्य विकसित करता येते. या शिक्षणक्रमाद्वारे वृत्तपत्रामध्ये संपादक, वृत्तसंकलक, वृत्तलेखक म्हणून नोकरी करता येते.स्वत:च्या लेखन कार्यातून वृत्तपत्रात लेखन करता येते. खासगी वृत्तपत्रही सुरू करता येते.

**१९.आरोग्य मित्र व रुग्ण सहायक प्रमाणपत्र :-**

या शिक्षणक्रमासाठी १०वी उत्तीर्ण पात्रता ठेवण्यात आलेली आहे. या शिक्षणक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये रोगाचे, आराजाचे, प्रतिबंधक उपाय, उपचारपद्धती तसेच आजारधारक व्यक्तीची सेवा करण्याचे ज्ञान व कौशल्य विकसित होतात. या शिक्षणक्रमामुळे विद्यार्थी एखाद्या दवाखान्यात सेवक म्हणून नोकरी करू शकतो. स्वत:चा व्यवसाय म्हणून आजारधारक व्यक्तीच्या घरी सेवा करण्याचे काम करु शकतो.

**२०. लॅब टेक्निक पदविका शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमासाठी किमान शैक्षणिक पात्रत १२वी पास विज्ञान शाखेच्या अनिवार्य आहे. हा शिक्षणक्रम एक वर्षाचा आहे. या शिक्षणक्रमामधून दवाखान्यात किंवा वैद्यक उपचारासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीचा वापर करण्याचे कौशल्य विकसित केले जाते. दवाखान्यात लॅब टेक्निशियन म्हणून नोकरी करता येते.

**२१. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम :-**

या शिक्षणक्रमाची शैक्षणिक पात्रता ही शिक्षक म्हणून सेवेत असावा. हा शिक्षणक्रम एक वर्ष कालावधीचा आहे. या शिक्षणक्रमामधून मुख्याध्यापकाचा सर्वांगिण विकास होत असतो. शाळेचे आर्थिक, प्रशासकीय, व्यवस्थापकीय ज्ञान व कौशल्य या शिक्षणक्रमामधून विकसित होत असतात. मुख्याध्यापक होण्यासाठी या पदविका शिक्षणक्रमाचा विचार केला जातो.

**२२.संगणक प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रम:-**

या शिक्षणक्रमासाठी किमान १०वी उत्तीर्ण ही अट ठेवण्यात आलेली आहे. या शिक्षणक्रमामध्ये एक वर्षाचे प्रमाणपत्र, पदविका शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. संगणकाचे बेसिक ज्ञान, कौशल्य तसेच संगणकातील उच्च ज्ञान या शिक्षणक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना

घेता येते. या शिक्षणक्रमाद्वारे स्वत:ला संगणकाची हाताळणी करता येते, डीटीपीचे ज्ञानकौशल्य आत्मसात करता येते. या शिक्षणक्रमातील संगणक ज्ञानामुळे विविध सॉफ्टवेअर विकसित करता येते. स्वयं रोजगार सुरु करता येतो. डेटा मायनिंगचे कार्य करता येते. विशिष्ट शिक्षणक्रमातील ज्ञान व कौशल्यांच्या आधारे डीटीपी, ई-मेल व सांख्यिकीय विश्लेषण करता येते.

याशिवाय विविध शिक्षणक्रम मुक्त विद्यापीठाद्वारे राबवले जातात. बी.एड्, एमबीए, सहकार व्यवस्थापन, फॅशन डिझायनिंग यासारख्या शिक्षणक्रमामधून व्यक्तींच्या वैयक्तिक विकासासह कौशल्यपूर्ण विकासाचा विचार केला जातो. या शिक्षणक्रमाच्या आधारे अनेक व्यक्तींनी स्वयं रोजगारही सुरू केलेले आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सर्वांसाठी शिक्षण घरोघरी पोहचविणे, वंचितांसाठी शिक्षण, अर्धवट शिकलेल्यांनी शिक्षण पूर्ण करून घेणे तसेच सामाजिक व राष्ट्रीय विकास करणे होय. ४० लाखांच्या वर विद्यार्थ्यांनी या विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले आहे.

विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन साहित्य वाचनासाठी दिले जाते. विद्यापीठाच्या यशवाणी रेडिओवरून विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती दिली जाते. विद्यार्थ्यांना अधिक वाचनासाठी सीडी रोम, दृक-श्राव्य चित्रफीत तयार केल्या जातात, तज्ज्ञ व्यक्तींकडून व्याख्याने तयार करून विद्यार्थ्यांसाठी वेबसाईटवर उपलब्ध करून दिली जातात. शिक्षणक्रमासंबंधित पाठ्यपुस्तके पीडीएफ रूपात वेबसाईटवर आहेत. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी फोन, ई-मेल व पत्राचा वापर करून समस्या सोडविल्या जातात. अभ्यासकेंद्रावरील संमंत्रकाकडून शैक्षणिक मार्गदर्शन प्राप्त होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान व कौशल्य निर्माण करून देण्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मोलाची भर घालीत आहे.

विद्यापीठाच्या वेबसाईटवर विविध शिक्षणक्रमाची माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. विद्यापीठाचे प्रवेश, शुल्क, परीक्षा ऑनलाईन घेतल्या जात आहेत आपण www.ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवर अवश्य भेट द्यावी.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**


१. माहितीपुस्तिका, (२०१७) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

२. लिंबाडे, शरणकुमार (२०००) ज्ञानगंगा घरोघरी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कुलसचिव, नाशिक

३. वार्षिक अहवाल, (२०१५) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कुलसचिव, नाशिक www.ycmou.digitaluniversity.ac


***